**विषय :-** महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. (MKCL) मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्राना एम. एस-सी आयटी (MS-CIT) अभ्यासक्रमासाठीच्या शुल्कापोटी कर्जपुरवठ्याची योजना

## १) प्रस्तावना

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. ही महाराष्ट्र शासन पुरस्कृत सार्वजनिक कंपनी असून या महामंडाळाची स्थापना सन २००१ मध्ये झाली आहे. या महामंडळामार्फत माहिती तंत्रज्ञान शिक्षणाचा प्रसार करणेत येतो. या महामंडळाने "महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इनफोरमेशन टेक्नॉलॉजी" (MS-CIT) या आभ्यासक्रमाच्या माध्यमातून राज्यात माहिती तंत्रज्ञान साक्षरता मोहिम सुरु केली आहे. महाराष्ट्र शासनानेही त्यांचे अधिकारी/ कर्मचा-यांसाठी तसेच नवीन नोकर भरतीसाठी सदर अभ्यासक्रम अनिवार्य करुन या अभ्यासक्रमास चालना दिलेली आहे.

महामंडळाचे दि. ३१.३.२००४ अखेर रु. ५००.०० लाखांचे भागभांडवल असून त्यात राज्य शासन व ११ विद्यापीठाचे समभाग आहेत. राज्यात प्रत्येक अभ्यासक्रमाच्या बॅचसाठी सुमारे १.०० लाख प्रशिक्षणार्थी प्रवेश घेत असून सर्वच जिल्ह्यात या अभ्यासक्रमासाठी चांगला प्रतिसाद प्राप्त होत आहे.

## २) एम. एस-सी आयटी अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती

एम. एस-सी आयटी अंतर्गत माइक्रोसॉप्ट ऑफिस, लोटस स्मार्टसुईट व ओपनऑफिस या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. एम. एस-सी आयटी अभ्यासक्रमाची परिक्षा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येते. या अभ्यासक्रमाचा कालावधी १२ आठवड्याचा असून शैक्षणिक वर्षामध्ये एकूण चार बॅचेस घेण्यात येतात. या अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षणार्थीकडून रु. २०१०/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येते. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन हा आभ्यासक्रम त्यांनी मान्यता दिलेल्या सुमारे ३२०० प्रशिक्षण केंद्रामार्फत राबवित असून गत वीस महिन्यात आठ लाखापेक्षा जास्त प्रशिक्षणार्थीनी या अभ्यासक्रमासाठी नोंदणी केली आहे.

या आभ्यासक्रमासाठी नोंदणी झालेल्या प्रशिक्षणार्थीच्या शुल्काची संपूर्ण रक्कम (प्रशिक्षणार्थीनी एकरकमी शुल्काचा भरणा केला नसला तरी) प्रशिक्षण केद्रांनी महामंडळाकडे सुपूर्द करणे (त्यांचे अंतर्गत करारानुसार) आवश्यक आहे. महामंडळ त्यापैंकी सुमारे ५०% रक्कम अभ्यासक्रम पूर्ण झालेनंतर प्रशिक्षण केद्रांना त्यांचे सेवेपोटी परत करते.

## ३) प्रशिक्षण केंद्राचे स्वरुप

या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण केंद्राचे जाळे नागरी, ग्रामीण व आदिवासी भागात पसरले असून महामंडळ, पब्लिक व प्रायव्हेट पार्टनरशिप या आधारावर प्रशिक्षण केंद्राना या अभ्यासक्रमासाठी मान्यता देते. विविध महाविद्यालये, पॉलिटेक्निकस्, आय. टी. आय, स्थानिक शैक्षणिक उद्योग व उद्योजक यांचेमार्फत चालविण्यात येणा-या प्रशिक्षण केंद्रामार्फत या अभ्यासक्रमाची अमलबजावणी करण्यात येते.

## ४) योजने अंतर्गत कर्जपूरवठ्याची उद्दिष्टे

**अ)** आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शुल्क हप्त्याने भरण्याची सुविधा देणे शक्य होण्यासाठी प्रशिक्षण केंद्राना अभ्यासक्रम शुल्कापोटी कर्जपुरवठा उपलब्ध करुन देणे व त्यायोगे त्यांना माहिती तंत्रज्ञान साक्षरता अभ्यासक्रम पूर्ण करणेस मदत करणे.

**ब)** या कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून राज्य शासन महामंडळाला (MKCL) त्यांचे माहिती तंत्रज्ञान साक्षरता मोहिमेच्या प्रयत्नास मदत करणे.

**क)** एम. एस-सी आयटी अभ्यासक्रमासाठी अधिकतम प्रशिक्षणार्थीनां प्रवेश देणे शक्य होणेसाठी या कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून प्रशिक्षण केंद्राना सहाय्य करणे.

## ५) योजनेची अंमलबजावणी

महामंडळाने (MKCL) एम. एस-सी आयटी (MS-CIT) अभ्याक्रमासाठी मान्यता दिलेल्या प्रशिक्षण केंद्रामार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात या योजनेची अंमलबजावणी करणेत येईल.
जिल्हा बॅकांना या योजनेअंतर्गत पात्र प्रशिक्षण केंद्राना कर्जपुरवठा उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

## ६) पात्रतेचे निकष

अ) प्रशिक्षण केंद्राना एम. एस-सी आयटी अभ्यासक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज महामंडळाची मान्यता असावी. तसेच महामंडळाने या अभ्यासक्रमासाठी प्रमाणित केलेल्या आवश्यक सेवा सुविधांची प्रशिक्षण केंद्राकडे उपलब्धतता असावी.
ब) प्रशिक्षण केंद्राकडे महामंडळाच्या मान्यतेबाबतचे प्रमाणपत्र असावे.
क) प्रशिक्षण केंद्राकडे इतर बँकांचे /अर्थिक संस्थाचे कोणतेही कर्ज नसावे.

## ७) कर्जपुरवठ्याचे स्वरुप

जिल्हा बँकेनी या योजनेअंतर्गत पात्र प्रशिक्षण केंद्राना कॅश क्रेडीट स्वरुपात कर्जमर्यादा मंजूर करावयाची आहे.

## ८) मार्जिन मनी

बँकांनी कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करताना एकुण अभ्यासक्रम शुल्काच्या २५ रक्कम मार्जिन मनी म्हणून ग्राह्य धरुन उर्वरित अभ्यासक्रम शुल्क रकमेपोटी कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करावी.

## ९) कॅश क्रेडीट मर्यादेचे प्रमाण

प्रशिक्षणार्थीकडून एम. एस-सी आयटी अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणा-या अभ्यासक्रम शुल्क रकमेच्या ७५% एवढी कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करणे योजनेअंतर्गत अपेक्षित आहे. तेव्हा जिल्हा बँकांनी अभ्यासक्रमाच्या बॅचसाठी प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन त्यापैकी एकरकमी अभ्यासक्रम शुल्क न भरणा-या व कर्ज घेण्यास इच्छुक असणा-या प्रशिक्षणार्थीकडून एकूण येणेबाकी असलेल्या रकमेच्या ७५% प्रमाणे कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करावी.
महामंडळाकडून (MKCL) अभ्याक्रमा शुल्काच्या ५०% प्रमाणे प्रशिक्षण केंद्राना त्यांचे सेवेपोटी परत करण्यात येणारी रक्कम प्राप्त होऊन कॅश क्रेडीट खात्यात जमा झाल्यानंतर बँकांनी मंजूर केलेली कॅश क्रेडीट मर्यादा पुढील बॅचसाठी पुनःस्थापित करावी.

## १०) कर्ज उचलीचे अधिकार

या अभ्यासक्रमासाठी प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या लाभार्थी विद्यार्थ्याकडून अभ्यासक्रम शुल्कापोटी येणेबाकी असलेल्या एकूण रकमेच्या ७५% एवढ्या रकमेपर्यंतची उचल प्रशिक्षण केंद्राना मंजूरी कॅश क्रेडीट मर्यादेतून घेता येईल.

## ११) फेरकर्जाची ठरीव प्रमाण

राज्य बँकेकडून जिल्हा बँकेने वितरीत केलेल्या कर्जाच्या ९०% पर्यंच फेरकर्ज उपलब्ध होऊ शकेल.

## १२) कर्जाचे तारण

विद्यार्थ्यांकडून व महामंडळाकडून (MKCL) अभ्यासक्रम शुल्कापोटी प्रशिक्षण केंद्राला प्राप्त झालेल्या व स्वीकारणीय असलेल्या संपूर्ण रकमेवर धारणाधिकारी कायदेशीर हक्क (Lien) स्वरुपात प्राथमिक बोजा नोंदवून तारण घेण्यात यावे. जिल्हा बँकांनी आवश्यकता असल्यास त्यांचे प्रचलित निकषानुसार प्रशिक्षण केंद्राकडून सांपार्श्विक हमी घ्यावी. जिल्हा बँकेनी रिझर्व्ह बँकेचे निकषानुसार कर्ज रकमेवर पूरेशा प्रमाणात तारण घेणे आवश्यक आहे.

१३) **व्याजदर**

अ) जिल्हा बँकेच्या स्वनिधीतून कर्जपुरवठा - याअंतर्गत जिल्हा बँकांना कमाल १२.००% पर्यंत व्याजाची आकारणी करणेचे स्वातंत्र्य राहील.
ब) राज्य बँकेच्या फेरकर्ज सुविधेअंतर्गत - फेरकर्जावरील व्याजदर ११% राहील.

१४) **प्रोसेसिंग शुल्क आकारणी**

जिल्हा बँकेने त्याचे प्रचलित तरतुदीनुसार प्रोसेसिंग शुल्क आकारणी करावी

१५) **कर्ज परतफेड कालावधी**

सदरचा कॅश क्रेडीट कर्जपुरवठा अल्प मुदतीचा असून प्रशिक्षण केंद्रांने याअंतर्गत उचल केलेली संपूर्ण रक्कम अभ्यासक्रमाची प्रत्येक बॅच पूर्ण झाल्यानंतर कॅश क्रेडीट कर्ज खात्यात जमा करुन सदर कर्जखाते क्रेडीट बॅलन्स करणे आवश्यक राहील. तद्‌नंतरच सदर खाते अभ्यासक्रमाच्या पुढील बॅचेसचेवेळी कार्यरत करता येईल.

## इतर अटी व शर्ती / चेल लिस्ट

१) जिल्हा बँकेनी अभ्यासक्रमासाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची यादी बॅच सुरु होणेपूर्वी प्रशिक्षण केंद्राकडून घ्यावी.
२) जिल्हा बँकांनी, प्रवेश घेतलेले विद्यार्थी, त्यांचेकडून प्राप्त झालेले शुल्क, इत्यादी माहितीची खातरजमा प्रवेश नोद पुस्तक व पावती पुस्तके तपासून करावी.
३) प्रशिक्षण केंद्रांनी जिल्हा बँकेकडे स्वतंत्र कॅश क्रेडीट खाते उघडून त्यातूनच मंजूर कॅश क्रेडीट मर्यादासंदर्भातील व्यवहार हाताळणे आवश्यक आहे.
४) अभ्यासक्रम शुल्कापोटी जमा होणारी संपूर्ण रक्कम बँकेच्या कॅश क्रडीट खात्यात प्रशिक्षण केंद्रांनी जमा करणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाला (MKCL) डिमांड ड्राफ्टद्वारे पाठविणेच येणारी रक्कम व महामंडळासमवेतील यानुषंगाने होणारे इतर आर्थिक व्यवहार या खात्यातूनच हाताळणे प्रशिक्षण केंद्रांना बंधनकारक राहील.
५) ज्या बँकांनी प्रशिक्षण केंद्राची अद्यावत आर्थिक पत्रके तपासून त्यांना प्राप्त होणारे उत्पन्न कर्जाच्या व्याजासह परत फेडीसाठी पुरेसे असल्याची खातरजमा करुन कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करावी.
६) प्रशिक्षण केंद्राने महामंडळाकडे (MKCL) अभ्यासक्रम शुल्काचा भरणा केल्याच्या अभ्यासक्रमाच्या मागील तीन बॅचेसच्या पावत्या तपासून केंद्राची महामंडळाशी असलेल्या योग्य आर्थिक व्यवहाराची शहानिशा करावी. आवश्यकता असल्यास जिल्हा बँकांनी महामंडळाकडून (MKCL) याबाबतची माहिती प्राप्त करुन तद्‌नंतरच प्रशिक्षण केंद्राना कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करावी.
७) महाराष्ट्र नॉलेज महामंडळाने (MKCL) खालील बाबींचा समावेश असलेले करारपत्र हमीपत्र करुन देणे आवश्यक आहे.

अ) महामंडळ एकूण शुल्काच्या ५०% अभ्यासक्रम शुल्क रकमेचा परतावा तसेच प्रशिक्षण केंद्रासमवेतील इतर अनुषंगिक आर्थिक व्यवहार जिल्हा बँकेकडील कॅश क्रेडीट खात्यामार्फतच करील.

ब) अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकात तसेच अभ्यासक्रम शुल्काच्या ५०% प्रमाणे केंद्रांना परतावा करणेबाबतच्या प्रचलित निकषात कोणतेही फेरबदल महामंडळ करणार नाही.

क) जिल्हा बँकेने प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या कर्जाच्या व्याजासह थकबाकीच्या परतफेडीची अंतिमतः हमी महामंडळाची (MKCL) राहील.

ड) महामंडळाला या योजनेअंतर्गत एम. एस-सी आयटी अभ्यासक्रमांतर्गत काही बदल सुचवावयाचे असल्यास ते अगाऊ जिल्हा बँकांना कळविणेत येतील.

८) महामंडळाकडून प्रशिक्षण केंद्रांना देय असलेल्या ५०% अभ्यासक्रम शुल्काचा परतावा प्राप्त झाल्याची खातरजमा जिल्हा बँकांनी प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंती करावी.

९) केवळ महामंडळाने मान्यता दिलेल्या प्रशिक्षण केंद्रांनाच व एम. एस-सी आयटी या अभ्यासक्रमासाठीच्या शुल्कापोटीच या योजनेअंतर्गत जिल्हा बँकांनी कॅश क्रेडीट कर्जपुरवठा मंजूर करावा.

१०) लाभार्थी प्रशिक्षणार्थाने अभ्यासक्रमाचे संपूर्ण शुल्क भरल्यानंतरच प्रशिक्षण केंद्रास संबंधितास प्रमाणपत्र अदा करणे बंधणकारक राहील.

११) जिल्हा बँकांनी कॅश क्रेडीट मर्यादा मंजूरीचा निर्णय प्रशिक्षण केंद्रातून प्राप्त कर्जमागणी प्रस्तावाची योग्यता तपासून घ्यावा. तसेच प्रशिक्षण केंद्राना कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर नामंजूर करणेचे, उचल देणेचे व मंजूर मर्यादेच्या उचलीस स्थगिती देण्याचे सर्वस्वी अधिकार अंतिमतः संबंधित जिल्हा बँकेचे राहतील.